# कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लि.

## गौतमनगर, पो.कोळपेवाडी, ता.कोपरगाव , जि.अहिल्यानगर.

**जा.क्र./ ऊस विकास / १८२८** **दि.२५/०८/२०२५**

## - परिपत्रक -

### :-ठिबक जलसिंचन प्रोत्साहनपर अनुदान योजना-:

कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक सभासद व"क" वर्ग सभासदांना कळविणेत येते की, **लागवड हंगाम २०२४-२५ (गळीत हंगाम २०२५-२०२६)** ऊस पिकाकरीता ठिबक जलसिंचन योजना राबविण्याचे धोरण मा.संचालक मंडळाने घेतलेले आहे.त्यास अनुसरुन ज्या ऊस उत्पादकांनी लागवड हंगाम २०२४-२५ मध्ये लागवड केलेल्या व खोडवा जोपसलेल्या ऊस पिकामध्ये ठिंबक संचाचा वापर करुन ऊस पिक जोपासणी केलेली आहे.असा ठिबक संचावरील उत्पादित ऊस गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये कारखान्याकडे गाळपास आल्यास त्यास **प्र.मे.टन रक्कम रुपये १००/-** प्रमाणे प्रोत्साहनपर अनुदान देण्याचे धोरण घेतलेले आहे.

### शर्ती व अटी

**१.** आडसाली,पुर्वहंगामी,सुरु व खोडवा पिकात सिंचनाकरीता ठिबक संचाचा वापर केलेला असेल अशा पात्र शेतकऱ्यांना अनुदान देयता राहिल त्याकरीता संबधीत शेतकऱ्यांनी आपला उस कारखान्याकडे वेळेत नोंदविणे आवश्यक राहिल.ऐनवेळीच्या ऊस नोंदीचा ठिबक अनुदानाकरीता विचार केला जाणार नाही.

**२.** संबधित शेतकऱ्यांनी ठिबक संच शेतात कार्यान्वित असलेबाबतचा.लेखी अर्ज कारखान्याकडे देणे आवश्यक राहिल

**३.** शेतकी विभागामार्फत ठिबक क्षेत्राचा सर्व्हे करतेवेळी ठिबक संच शेतात कार्यान्वित नसल्यास तो अर्जदार अनुदानास पात्र राहणार नाही.

**४.** ऊस पिकातील ठिबक संचाच्या लॅटरल ह्या ऊस तोडणी पुर्वी १५ ते २० दिवस अगोदर काढण्यात याव्या.तोपर्यत ऊस पिकाच्या सिंचनाकरीता ठिबक संचाचा वापर करावा.

वरील ठिबक सिंचन योजनेच्या नियम व अटी या प्राथमिक स्वरूपाच्या असून त्यात बदल करणेचा अधिकार मा.संचालक मंडळाने राखून ठेवलेला आहे.

**आपला विश्वासू**
एस.एस.बोरनारे
**कार्यकारी संचालक**

कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लि.

गौतमनगर, पो.कोळपेवाडी, ता.कोपरगाव , जि.अहिल्यानगर.

**जा.क्र./ ऊस विकास /१८२६** **दि. २५/०८/२०२५**

# - परिपत्रक -

## :-विक्रमी ऊस उत्पादना करीता उत्तेजनार्थ बक्षिस योजना-:

कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक सभासद व"क" वर्ग सभासदांना कळविणेत येते की, आपले कारखाना कार्यक्षेत्रातील ऊसाची सरासरी उत्पादकता एकरी ३० ते ३५ मे.टन इतकी आहे.पश्चिम महाराष्ट्रात बहुतांश ऊस उत्पादक शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन एकरी १०० मे.टनाच्या पुढे ऊस उत्पादन घेत आहेत.आपले कारखाना कार्यक्षेत्रात सुध्दा ६०ते ७० मे.टन प्रति एकरी ऊस उत्पादन घेणारे शेतकरी आहेत.तथापी ऊस पिकात कृत्रिम बुध्दीमत्ता(AI)चा वापर,ठिबक सिंचनाचा वापर, सेंद्रीय खतांचा वापर,जैविक खताचा वापर, रासायनिक खंताबरोबर दुय्यम व सुक्ष्म अन्नद्रव्याचा वापर,किड नियंत्रण,बेणे बदल इत्यादी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास प्रती एकरी १०० मे.टन ऊस उत्पादन मिळु शकते. ऊस उत्पादकामध्ये ऊस उत्पादन वाढीची स्पर्धा निर्माण व्हावी याकरीता मा.संचालक मंडळाने ऊस उत्पादन वाढीकरीता उत्तेजनार्थ बक्षिस योजना **गाळप हंगाम सन २०२५-२०२६ व गाळप हंगाम सन २०२६-२०२७ या कालावधी** करीता धोरण राबविण्याचे ठरविले आहे. बक्षिस स्पर्धेचा तपशिल आणि शर्ती व अटी खालीलप्रमाणे असणार आहे.

| अ.न | सरासरी ऊस उत्पादकता मे.टन/एकरी | प्रोत्साहन बक्षिस रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | १०१ मे.टनाचे पुढे | ७१,०००/- |
| २ | ९१ ते १०० मे.टन/एकरी | ५१,०००/- |
| ३ | ८१ ते ९० मे.टन/एकरी | ३१,०००/- |
| ४ | ७५ ते ८० मे.टन/एकरी | २५,०००/- |

**शर्ती व अटी**

१. सदरची बक्षिस योजना ही गाळप हंगाम **सन २०२५-०२६ व गाळप हंगाम सन २०२६-०२७ या** दोन वर्षाकरीता लागु राहील.

२. संबधित ऊस उत्पादकांने ऊसाची नोंद कारखान्याकडे वेळेत करणे आवश्यक राहिल.ऐनवेळी ऊस नोंदीचा स्पर्धेकरीता विचार केला जाणार नाही.तसेच योजनेत सहभाग नोंदविणेकरीता ऊस तोडणी पुर्वी कारखान्याकडे विहित नमुन्यात अर्ज देणे आवश्यक राहील.

३. तुटणाऱ्या ऊसाचे क्षेत्र कमीत कमी **१ एकर** असणे आवश्यक आहे.

४. सदरचा तुटलेला ऊस प्लॉट स्वंतत्र असावा.तसेच तो एकाच व्यक्तीच्या नावावर कारखान्याकडे गाळपास आलेला असावा.सामाईक क्षेत्रातुन तुटलेला ऊस बक्षिस योजनेस पात्र असणार नाही.एक ऊस उत्पादक कोणत्याही एकाच बक्षिसास पात्र राहील.

५. संबधित शेतकऱ्याची व त्यांच्या एकत्रित कुंटुबातील ऊस क्षेत्राची एकाच वेळी ऊस प्लॉटची ऊस तोड चालु नसावी.

६. कारखान्याकडे पुरवठा केलेले ऊस टनेज व प्रत्यक्ष क्षेत्र याची मोजमाप व खातरजमा करुनच बक्षिस देयता राहील.

७. बक्षिस योजनेसंदर्भात काही माहिती अथवा स्पष्टीकरण आवश्यक वाटल्यास कारखान्याचे शेतकी अधिकारी व ऊस विकास अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

वरील योजनेच्या नियम व अटी या प्राथमिक स्वरूपाच्या असून त्यात बदल करणेचा अधिकार मा.संचालक मंडळाने राखून ठेवलेला आहे.

**आपला विश्वासू**
एस.एस.बोरनारे
**कार्यकारी संचालक**

# कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लि.
## गौतमनगर, पो.कोळपेवाडी, ता.कोपरगाव , जि.अहिल्यानगर.

**जा.क्र./ ऊस विकास /१९१५** **दि. ०२/०९/२०२५**

## - परिपत्रक -
## :-ठिबक जलसिंचन योजना-:
### लागवड हंगाम २०२५-२०२६(गळीत हंगाम २०२६-२०२७) करीता

कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक सभासद व क वर्ग सभासदांना कळविण्यात येते की,ठिबक सिंचनाव्दारे उपलब्ध पाण्याचा योग्य प्रमाणात वापर करुन कमीत कमी पाण्यांत व जमिनीची उत्पादक क्षमता कायम ठेवुन अधिक उत्पादन घेणे हा ठिबक सिंचनाचा मुख्य उद्देश आहे.

लागवड हंगाम २०२५-२६(गा.हं.२०२६-२७) करीता ऊस पिकामध्ये ठिबक सिंचनाचा वापर वाढावा याकरीता मा.संचालक मंडळाने खालीलप्रमाणे ठिबक धोरणास मान्यता दिलेली आहे.त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे.

**अ) अनुदानास पात्र(आयएसआय)/नॉन आयएसआय(बिगर अनुदान पात्र) ठिबक जलसिंचन संच .**

| अ.न | योजनेचा तपशिल | योजनेचे स्वरुप व आर्थिक सहभाग |
|---|---|---|
| १ | **कारखाना सहभाग (ॲडव्हान्स)** | जे ऊस उत्पादक सभासद शेतकरी नविन ऊस लागवडीस अथवा खोडवा पिक क्षेत्रामध्ये नविन आयएसआय १६ एम.एम अथवा नॉन-आयएसआय १६ एम.एम व्यासाची (०.४०ते ०.४५ एम.एम) जाडीचे ठिबक संच शेतात बसवतिल व त्यांना संच खरेदीसाठी रक्कम रुपये १००००/- प्रती एकरी ॲडव्हान्स व रक्कम रुपये ५०००/- प्रती एकरी अनुदान देण्यात येईल.जे ऊस उत्पादक कारखान्यामार्फत ठिबक संच खरेदीकामी ॲडव्हांस घेतील त्यांना प्रती मे.टन रक्कम रुपये १००/- प्रोत्साहनपर अनुदानाचा लाभ मिळणार नाही. |
| २ | **शेतकरी सहभाग** | कारखाना ॲडव्हान्स व अनुदान रक्कमे व्यतिरीक्त उर्वरीत कोटेशन प्रमाणे ठिबक संच खरेदी रक्कम शेतकऱ्यांनी कारखान्याकडे रोख भरणा करावयाची आहे. |
| ३ | **लाभार्थी पात्रता** | कारखान्याकडे ऊस नोंद केलेली असावी तसेच यापुर्वी ठिबक जलसिंचन योजनेचा व कारखान्याचे थकबाकीदार नसलेले सभासद शेतकरी पात्र राहील. |
| ४ | **आवश्यक कागदपत्र** | ठिबक संच मागणी अर्ज,पेंमेट कपातीचे संमती पत्र, आधार कार्ड व दोन पासपोर्ट साईज फोटो. ७/१२ , ८ अ उतारा, ठिबक संचाचे कोटेशन,दोन 'अ 'वर्ग ऊस नोंद असलेले सभासद जामिनदार त्यांचे संमतीपत्र, |
| **ब.** | **नवे किंवा जुने ऊस पिकासाठी बसविलेले ठिबक संच-:** | |
| जे सभासद शेतकरी खाजगी स्वमालकीचे त्यांचेजवळ असलेले जुने अथवा नवे(स्वखर्चाने) ठिबक संच ऊस पिकासाठी बसवतील त्याची प्रत्यक्ष पाहणी करून व विहित नमुन्यात अर्ज घेऊन सदरचा ठिबक संचावरील उत्पादित झालेला असा ऊस गळीतास आलेनंतर प्रती मे.टन रू.१००/- प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येईल.कारखान्याचे शेतकी विभागामार्फत ऊस पिकाचा सर्व्हे केला जाईल.त्यावेळी जर ऊस पिकात ठिबक संच कार्यान्वित नसल्यास त्यांना अनुदान देयता राहणार नाही. | | |

**योजनेच्या शर्ती व अटी-:**

१. कारखान्याकडे ऊस नोंद असणे आवश्यक आहे.
२. अपेक्षित खर्चापेक्षा येणारा जास्तीचा खर्च शेतकऱ्यांने परस्पर ठिबक कंपनीस अदा करावयाचा आहे.
३. शासकिय अनुदान प्राप्त करण्याची जबाबदारी संच पुरवठा करणारी कंपनी व लाभार्थी शेतकरी यांची राहील त्यास कारखाना जबाबदार राहणार नाही.
४. दिलेल्या ॲडव्हान्स रक्कमेतुन अनुदान रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कम लाभ धारकाचे ऊस बिलातून अग्रहक्काने कारखाना धोरणाप्रमाणे सव्याज वसूल केली जाईल.

५. नॉन- आयएसआय ठिबक संचास शासकिय अनुदान मिळत नसल्यामुळे ठिबक संचाबाबत कारखाना अथवा ठिबक कंपनी कुठल्याही प्रकारची गॅरंटी/वॉरंटी घेणार नाही मात्र सदर संचाची लॅटरल १६ एम.एम व्यासाची १६ मिल किंवा कमीत कमी ०.४० एम .एम जाडीची असणे आवश्यक आहे .

६. या योजनेचा लाभ 'अ' वर्ग सभासद व नाममात्र सभासद यांना देण्यात येणार आहे.

७. ठिबक संचाचे साहित्याची वाहतूक ही वितरकाचे दुकानापासून ते शेतापर्यत लाभार्थी शेतक-याने स्वत: करावयाची आहे..

८. ठिबक सिंचन संचावर उत्पादित केलेला ऊस कोणत्याही कारणास्तव गळीतास न आल्यास कारखाना ॲडव्हान्स व अनुदान रक्कम ऊस उत्पादकाचे कुठल्याही देय पेमेंट मधून अथवा एकत्रित कुंटुबातील किंवा जामीनदाराचे देय पेमेंटमधून सव्याज वसूल केली जाईल.

९. खाजगी ठिबक असणा-या शेतक-यांनी विहीत नमुन्यात ठिबक संच असल्याचा अर्ज देणे आवश्यक राहील.

१०. ऊस उत्पादक शेतकऱ्यांने कारखाना नियुक्त केलेल्या संच वितरक कंपनीतुन एकाची निवड करणे आवश्यक राहील.

११. सभासदाने कारखान्याकडे ठिबक संच खरेदी करीता विहित नमुन्यात अर्ज व उर्वरीत रक्कम रोख भरलेनंतरच ठिबक संचाचा पुरवठा करण्यात येईल.

वरील ठिबक सिंचन योजनेच्या नियम व अटी या प्राथमिक स्वरूपाच्या असून त्यात बदल करणेचा अधिकार मा.संचालक मंडळाने राखून ठेवलेला आहे.योजनेत सहभागी ठिबक कंपन्या व योजनेच्या अधिक माहितीसाठी कारखान्याचे ऊस विकास कार्यालयाशी संपर्क साधावा व जास्तीत जास्त ऊस लागवड ठिबक सिंचनाखाली घेण्यात यावी ही विनंती.

कळावे,

**आपला विश्वासु**

**एस.एस.बोरनारे**

**कार्यकारी संचालक**